# सोलापूर विद्यापीठास श्री. सिध्देश्वर महास्वामीजींची सदिच्छा भेट

सोलापूर: मा. प.पू. श्री. सिध्देश्वर महास्वामीजी व त्यांचे शिष्य श्री. चक्रवर्ती सुलीबेले दि.०६/१२/२०१६ रोजीच्या भेटी दरम्यान भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या ६१ व्या महापरिनिर्वान दिनानिमित्त विद्यापीठात प्रतिमा पूजन करुन विद्यापीठातील भूशास्त्र संकुल येथील "डी.एन. वाडिया भूशास्त्र संग्रहालयास" व सामाजिकशास्त्रे संकुलातील "पुरातत्वशास्त्र संग्रहालयास" भेट देवून समाधान व्यक्त करुन विद्यापीठाच्या भविष्याकालीन जडणघडणीस शुभेच्छा दिल्या.

श्री. चक्रवर्ती सुलीबेले यांनी सर्व उपस्थितांना विशेष: विद्यार्थ्यांना आपल्या तडाखेबाज वक्तृव शैलीने देश भक्तीपर, भारताचे बदलते आर्थिक धोरण, तरुणांची जबाबदारी व योगदान यावर अभ्यासपूर्ण विवेचन करुन मंत्रमुग्ध केले. ते म्हणाले की, "या देशातील आर्थिक सुबत्ता व वैभवसंपन्नता पाहून ग्रीक, शक, हुन, कुशान, मोगल, पोर्तूगीज व इंग्रज आले इ.स. ख्रिस्त पूर्वीपासून या देशाचा व्यापार पाश्चात्यासोबत होता. येथील वस्तुंचे मोल पाश्चात्य देशातील नागरिक सोन्याच्या बरोबर करत होते. येथील वस्तु घेवून त्या मोबदल्यात ते सोने देत होते, असा विनिमय होता." म्हणून या देशाला सोने की चिडिया असे संबोधले जात होते. आजही या देशात अमाप संपत्ती आहे. परंतु त्याचे वितरण, विनिमय समतुल्य नसल्याने आपला देश आपेक्षित विकासदर साधू शकत नाही. त्यासाठी आजच्या तरुणाची जबाबदारी जास्तच वाढलेली आहे. सद्यस्थितीत घडत असलेल्या आर्थिक धोरण या देशाला एका विशिष्ट उंचिवर नेऊन आपला देश विश्वगुरुकडे वाटचाल करत आहे, ही स्तूत्यबाब आहे. यास्तव भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी त्यांच्या Problem of Rupees या ग्रंथात त्यांनी भारताच्या आर्थिक ध्येय धोरणाविषयी भाष्य करताना सांगितले आहे की, दर दहा वर्षांनी भारतीय चलनाचे Demonetization होणे आवश्यक आहे. त्यानुसार सध्या देशात याबाबत परीवर्तन झाल्याचे दिसून येते.

या कार्यक्रमाचे अध्यक्षस्थान मा. एन. एन. मालदार, कुलगुरु, सोलापूर विद्यापीठ, सोलापूर यांनी भूषविले तर सोलापूर विद्यापीठाचे प्रथम कुलगुरु प्रा. ईरेश स्वामी यांची या कार्यक्रमास प्रमुख उपस्थिती होती. प्राचार्य, आर. वाय. पाटील, संचालक, महाविद्यालये व विद्यापीठ विकास मंडळ यांनी प्रास्तविक केले. या कार्यक्रमास श्री. बी. पी. पाटील, परीक्षा नियंत्रक तथा प्र. कुलसचिव, डॉ. बालाजी शेवाळे, वित्त व लेखा अधिकारी, बहुसंख्येत विद्यार्थी, विद्यार्थीनी, शिक्षक, अधिकारी व कर्मचारी उपस्थिती होते.

---

संदर्भ क्र. सोविसो/कु.का./ प्रेसनोट/२०१६/ 11128 दिनांक- 8 DEC 2016

प्रति,

मा. संपादक,

सोलापूर शहरातील सर्व दैनिके.

सोलापूर.

महोदय,

उपरोक्त बातमी आपल्या लोकप्रिय दैनिकात प्रसिध्द करावी, ही विनंती.

आपला,

(बी. पी. पाटील)

प्र.कुलसचिव

Sidheswar Mahaswami 06122016